रविवार, १५ ऑगस्ट २०२१

संवाद

'नियतीशी करार' ते 'मन की बात'

नेहरूंनी आपल्या भाषणात नियतीशी केलेल्या कराराची आठवण करून दिली होती. मोदींनी केलेल्या असंख्य 'मन की बात'मध्ये त्यांचा 'हिंदू पाकिस्ताननिर्मिती'चा अजेंडा अनुच्चारित, पण अव्याहत राहिला आहे. नियतीशी केलेल्या कराराची चाड असेल, तर खऱ्या 'भारतभाग्यविधात्या'ला, येथील सजग नागरिकाला जोखीम स्वीकारून लोकशाहीच्या बाजूने उभे राहावेच लागेल.

- रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ

युद्ध आणि तंत्रज्ञान

'राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लष्करी दलांचा वापर' हा 'युद्ध' या शब्दाचा पारंपरिक अर्थ होतो. तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल, भविष्यात लढल्या जाणाऱ्या युद्धांचा मार्ग बदलत आहेत. त्यासाठीच आपल्यालादेखील आपल्या सामरिक गरजा पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञानानुषंगिक बदल करणे क्रमप्राप्त ठरते. - समीर मित्तल

स्वातंत्र्यानंतर लगोलगच भारताला युद्धात उतरावे लागले. त्यानंतर देशाची संरक्षण व्यवस्था एक एक पाऊल पुढे टाकत आली आहे. तिन्ही सैन्यदलांतील निवृत्त अधिकाऱ्यांनी घेतलेला हा पंचाहत्तर वर्षांच्या प्रवासाचा आढावा...

सदैव सैनिका पुढेच जायचे - अविनाश चव्हाण

शक्तिशाली भरारी - शिरीष देव

सागरी शक्तीचा उदय - मुरलीधर पवार

याशिवाय महात्म्याचा लढा : काल आणि आज (मकरंद लोंढे), समतामूलक शाश्वत विकासासाठी...(प्रा. एच. एम. देसरडा), वाटचाल परराष्ट्र धोरणाची (हर्षद भागवत) हे लेख आणि दीडदमडी, हिरवी पोर्ट्रेट्स, कथाख्यान ही लोकप्रिय सदरे...

करोनायोद्ध्यांना घरे

सिडकोची नवी मुंबईत विशेष योजना; १५ ऑगस्टपासून ऑनलाइन अर्ज नोंदणी

म.टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

करोनाकाळात अत्यंत बिकट परिस्थितीतही डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी, पोलिस, सफाई कर्मचारी आणि अन्य अत्यावश्यक सेवांमधील कर्मचाऱ्यांनी प्रसंगी जीवावर उदार होऊन सेवा बजावली आहे. त्यांच्या या कामगिरीबाबत कृतज्ञता म्हणून सिडकोच्या माध्यमातून त्यांच्यासाठी घरे राखीव ठेवण्याचे निर्देश नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार, करोना योद्धे व गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता सिडकोच्या विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट रोजी होणार असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत सिडकोकडून संपूर्ण महाराष्ट्रातील करोनायोद्धे व गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता नवी मुंबईच्या पाच नोडमध्ये ४,४८८ घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या गृहनिर्माण योजनेतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली व द्रोणागिरी या पाच नोडमध्ये ४,४८८ घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. यापैकी १,०८८ घरे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी, ईडब्ल्यूएस आणि उर्वरित ३,४०० घरे सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत. तसेच, वैधानिक तरतुदींनुसार काही घरे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, दिव्यांग प्रवर्गाकरिता राखीव आहेत.

राज्य सरकारच्या २९ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार करोनाकाळात रुग्ण सर्वेक्षण, रुग्णांचा माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व सहाय्यता उपक्रमांशी संबंधित शासनाच्या विविध विभागांतील कर्मचारी, करोना संबंधी कर्तव्यावर असणारे आरोग्य कर्मचारी व अन्य कर्मचारी ,जिल्हा प्रशासन, पोलिस, होमगार्ड, अंगणवाडी सेविका, वित्त व कोषागार, अन्न व नागरी पुरवठा, पाणीपुरवठा व स्वच्छता, घरोघरी जाऊन सर्वेक्षणाचे नेमून दिलेले विविध विभागांचे कर्मचारी इ., तसेच करोना संबंधी कर्तव्यावर असणारे कंत्राटी, बाह्यकंत्राटी, रोजंदारी तसेच मानधन तत्त्वावरील कर्मचारी यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांकडे सक्षम अधिकाऱ्याकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक असणार आहे.

करोनायोद्ध्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी राज्य सरकारच्या मार्गदर्शनाखाली सिडकोने ही विशेष गृहनिर्माण योजना आणली आहे, असे सिडकोचे उपाध्यक्ष व महाव्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी सांगितले.

माहिती उपलब्ध

या योजनेशी संबंधित सविस्तर माहिती, घरांचा तपशील, विविध प्रवर्गांकरिता राखीव घरे, अनामत रक्कम, योजनेचे वेळापत्रक इ. https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावरून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केली आहे. इच्छुक अर्जदारांनी या पुस्तिकेचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. तसेच राज्यातील अधिकाधिक करोनायोद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांनी या गृहनिर्माण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोने केले आहे.

'नू पॉवर'ला वीज आयोगाने फटकारले

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

आयसीआयसीआय बँकेच्या माजी व्यवस्थापकीय संचालिका चंदा कोचर व त्यांचे पती दीपक कोचर यांनी केलेल्या घोटाळ्यात नाव असलेल्या नू पॉवर रिन्युवेबल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला वीज नियामक आयोगानेही फटकारले आहे. ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या मुदतवाढीची परवानगी आयोगाने नाकारली आहे.

चंदा कोचर यांचे पती दीपक कोचर हे नू पॉवर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक होते. वास्तवात ही कंपनी कागदोपत्रीच होती. तसे असतानाही चंदा कोचर यांनी आयसीआयसीआय बँकेतील स्वतःच्या पदाचा गैरवापर करत नू पॉवर कंपनीला कर्ज वितरित केले. हे कर्ज बुडीत खात्यात गेले. हे प्रकरण बाहेर आल्याने ही कंपनी त्यांचे नियोजित ऊर्जा निर्मिती प्रकल्प पूर्ण करू शकलेली नाही. यातील एक प्रकल्प सांगली जिल्ह्यातील जत येथील आहे.

जतमध्ये नू पॉवर कंपनी पवन ऊर्जेवर आधारित २.८० मेगावॅट क्षमतेचा ऊर्जा प्रकल्प उभा करणार होती. या प्रकल्पातून वीजखरेदीचा प्राथमिक करार त्यांनी महावितरणशी केला होता. परंतु २०१७-१८ दरम्यान घोटाळ्यात नाव आल्यानंतर या प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाली नाही. त्यामुळे महावितरणने त्याच परिसरातील अन्य कंपन्यांशी करार करून तेथून वीज खरेदी सुरू केली. या पार्श्वभूमीवर कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोगात धाव घेतली होती.

जत येथील या प्रकल्पातून वीजनिर्मिती सुरू करण्यासाठी महावितरणने मंजुरी द्यावी, यासाठी महावितरणला आदेश द्यावा, तसेच हरित ऊर्जा प्रकल्प म्हणून या प्रकल्पाची नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणला (मेडा) आदेश द्यावा व या प्रकल्पातून वीज खरेदीसाठी महावितरणला आदेश द्या, या तीन प्रमुख मागण्या नू पॉवरकडून आयोगाकडे केल्या होत्या. परंतु हा प्रकल्प ग्रीडला जोडण्यात आलेला नाही. या महत्त्वाच्या कारणासह अन्य कारणांमुळे वीज नियामक आयोगाने नू पॉवर रिन्युवेबल्स प्रायव्हेट लिमिटेडची याचिका फेटाळली.

वीजनिर्मितीसाठी मुदतवाढ नाही

कथित दहशतवाद्याला जामीन

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

परभणी जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयावर दहशतवादी हल्ला घडवण्याच्या कथित कटात सहभागी झाल्याच्या आरोपाखाली पाच वर्षांपासून अटकेत असलेला इक्बाल अहमद कबीर अहमद (२८) याला मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी सशर्त जामीन मंजूर केला. खटला संपेपर्यंत मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाच्या हद्दीतच राहावे लागेल आणि न्यायालयाच्या परवानगीविना मुंबईबाहेर जाता येणार नाही, यासह अनेक कठोर अटी न्या. संभाजी शिंदे व न्या. निजामुद्दीन जमादार यांच्या खंडपीठाने त्याला घातल्या.

इक्बालला पोलिसांनी ७ ऑगस्ट, २०१६ रोजी अटक केली होती. त्याच्याविरोधात बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा (यूएपीए) या दहशतवादविरोधी कायद्यासह भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. एनआयए न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्याने त्याने अॅड. कृतिका अगरवाल यांच्यामार्फत अपिल केले होते.

'इक्बालविरोधात सबळ पुरावे नाहीत. शिवाय या खटल्यात न्यायालयाने अद्याप पुरावे नोंदवणेच सुरू केलेले नसून दीडशेहून अधिक साक्षीदार तपासले जाणार आहेत. परिणामी खटला लवकर संपण्याची शक्यता दुरापास्त आहे. इक्बालने आतापर्यंत पाच वर्षांचा तुरुंगवास भोगला आहे', असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील मिहिर देसाई यांनी मांडला. तर 'आरोपीविरोधातील आरोप गंभीर असून पुराव्यांतून त्याचा सहभागी प्रथमदर्शनी स्पष्ट होतो. न्यायालयाकडून आरोप निश्चिती झाली असल्याने खटलाही लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे', असा युक्तिवाद एनआयएतर्फे विशेष सरकारी वकील अरुणा पै यांनी मांडला. मात्र, 'आरोपीने शिक्षेचा किमान कालावधी तुरुंगात काढला असून खटला नजीकच्या काळात संपण्याची शक्यताही अत्यंत कमी आहे.

अशा परिस्थितीत त्याला जामीन नामंजूर करणे अवास्तव व अवाजवी होईल आणि त्याच्या जीवन जगण्याच्या व व्यक्तीस्वातंत्र्याच्या हक्काचे उल्लंघन होईल', असे निरीक्षण आपल्या ३५ पानी निकालात नोंदवून खंडपीठाने एनआयए न्यायालयाचा निर्णय रद्द करत इक्बालचे अपिल मान्य केले.

खटला लवकर संपणे दृष्टिपथात नाही

जामिनासाठी आणखी अटी

- एक लाख रुपयांच्या वैयक्तिक हमीवर आणि तेवढ्याच रकमेच्या एक किंवा दोन हमीदारांनी अट.
- एनआयए मुंबई शाखेच्या कार्यालयात पहिल्या महिन्यात दर आठवड्यात मंगळवारी व शुक्रवारी हजेरी लावायची, नंतरच्या दोन महिन्यांत प्रत्येक गुरुवारी आणि त्यानंतर खटला संपेपर्यंत प्रत्येक महिन्याच्या मंगळवारी हजेरी लावायची.
- पासपोर्ट असल्यास तो एनआयएकडे जमा करायचा.
- अशा आरोपाच्या कोणत्याही गुन्ह्यात सहभागी व्हायचे नाही.
- सरकारी पक्षाच्या साक्षीपुराव्यांशी छेडछाड करू नये आणि सहआरोपींशी कोणत्याही प्रकारे संपर्क करायचा नाही.
- खटला लवकर पूर्ण होण्यासाठी संपूर्ण सहकार्य करायचे.
- कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास जामीन रद्द होईल.

पोलिसांच्या ताब्यातील चोरट्याचा मृत्यू

म.टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

शुक्रवारी पहाटे कोपरखैरणे सेक्टर-१९मधील धरामध्ये चोरी करण्यासाठी शिरलेल्या चोराला नागरिकांनी पकडून मारहाण केली. त्यानंतर त्याला पोलिसांच्या हवाली केले होते. मात्र त्यानंतर अत्यवस्थ झालेल्या चोरट्याला रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेताना त्याचा मृत्यू झाला. पोलिसांच्या ताब्यात असताना मृत्यू झाल्याने या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाला (सीआयडी) देण्यात आहे.

या घटनेतील मृत दिनेश देवराज चव्हाण (२५) हा कोपरखैरणे सेक्टर-५मध्ये राहत होता. शुक्रवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास तो मद्यधुंद अवस्थेत कोपरखैरणे सेक्टर-१९मधील पहिल्या मजल्यावरील एका धरामध्ये चोरी करण्यासाठी घुसला होता. यावेळी धरामध्ये झोपलेल्या दाम्पत्याला जाग आल्याने त्यांनी दिनेशला पकडले. त्यानंतर त्या भागातील रहिवाशांनी दिनेशला कोपरखैरणेतील होळी मैदानात नेऊन मारहाण केली. त्यानंतर पोलिसांच्या हवाली केले. त्यानंतर कोपरखैरणे पोलिसांनी त्याला पोलिस ठाण्यात नेऊन बसविले. अर्ध्या तासानंतर त्याच्या छातीत दुखू लागल्याने पोलिसांनी त्याला रुग्णालयात नेले. मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

कोपरखैरणे पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून चव्हाणचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात पाठवला आहे.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

परिपत्रक क्रमांक : ८३७(३)(२८)/२०८६/पाच दिनांक :-१३ ऑगस्ट,२०२१

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागा अंतर्गत येणाऱ्या खाली नमूद संवर्गाच्या एकूण ८१२ पदांवरील भरती करीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

अ.क्र.	जाहिरात क्रमांक	पदाचे नाव	एकूण पदे
१	२५/२०२१ ते ३५/२०२१	विविध विषयातील सहायक प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब (राजपत्रित) (अतिविशेषीकृत पदे)	९०
२	३६/२०२१	प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी (होमिओपॅथी), आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, गट-अ	१
३	३७/२०२१ ते ५८/२०२१	विविध विषयातील सहायक प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब (राजपत्रित)	७२१

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरती प्रक्रियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

३. सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. उपरोक्त अनुक्रमांक १ व २ येथील जाहिरातींसाठी आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे (https://mpsconline.gov.in) दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १४:०० ते ०१ सप्टेंबर २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त अनुक्रमांक ३ येथील जाहिरातीसाठी आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे (https://mpsconline.gov.in) दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १४:०० ते ०२ सप्टेंबर २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (सरळ सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग

GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

CIN: L16004MH1936PLC008587:

website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com

Extract of unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter ended June 30, 2021

(Rs. in Lakhs)

Sl. No.	Particulars	Standalone			Consolidated		
		Quarter ended 30.06.2021	Year ended 31.03.2021	Quarter ended 30.06.2020	Quarter ended 30.06.2021	Year ended 31.03.2021	Quarter ended 30.06.2020
1	Total Income from Operations	73074	292574	45588	73549	296143	46257
2	Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	12755	46495	5825	13233	48782	6275
3	Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	12755	46495	5825	13233	48782	6275
4	Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	10809	35694	5177	11235	37646	5509
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	10614	35558	5001	11387	39464	5644
6	Equity Share Capital	1040	1040	1040	1040	1040	1040
7	Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (Rs.) (*not annualised)	20.79*	68.65	9.96*	21.61*	72.41	10.60*

Notes:

1. The above is an extract of the detailed format of Statements of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter ended June 30, 2021 ("These Results") filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. These Results and this extract were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at the meeting held on August 13, 2021. These Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).

2. The Limited Review, as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended, has been completed on These Results and the Limited Review Reports by the Auditors have been filed with the Stock Exchanges. These Reports do not have any impact on These Results which needs to be explained.

Registered Office: 'Macropolo Building', Ground Floor, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033.

For and on behalf of the Board
(Dr. Bina Modi)
Managing Director

Place: New Delhi
Dated: August 13, 2021

सिडकोने नामांतराचा मुद्दा आणलाच कसा?

म. टा. वृत्तसेवा, पनवेल

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू असतानाच सिडकोने नामांतरणाचा मुद्दा पुढे कसा आणला, असा प्रश्न केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी उपस्थित केला. प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय नामकरण कृती समितीची शिष्टमंडळाने शुक्रवारी शिंदे यांची दिल्लीत भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला.

केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्यासोबत दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. केंद्र सरकार नेहमी भूमिपुत्रांच्या सोबत असून तुमच्या भावनांचा विचार करून नक्कीच सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करू, असे मतही शिंदे यांनी यावेळी झालेल्या भेटीत व्यक्त केले.

सिडको नामकरणाची घाई का करीत आहे, असा सवालही त्यांनी याप्रसंगी उपस्थित केला. विमानतळाचे काम सुरू असताना सिडकोने नामकरणाची घाई केली असल्याचे ते म्हणाले. याबाबतीत संबंधितांशी चर्चा करू असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, उपमहापौर जगदिश गायकवाड, जे. डी. तांडेल, संतोष केणे, गुलाब वझे, राजेश गायकर, दीपक पाटील, संतोष घरत, विनोद म्हात्रे, नंदेश ठाकूर, गोपीनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.

ज्योतिरादित्य शिंदे यांचा सवाल

चर्चा मराठीत

केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी प्रकल्पग्रस्तांशी मराठी चर्चा केल्यामुळे सर्वांना धक्का बसला. शिंदे यांनी भेट मराठीत चर्चेला सुरुवात केल्यामुळे ही चर्चा अधिक आपुलकीची वाटल्याचे समितीचे सदस्य राजेश गायकर यांनी मराठी बोलताना सांगितले.

'बलात्काराचा पुरावा नाही'

नवी दिल्ली : दिल्लीत नऊ वर्षांच्या बालिकेची हत्या होण्यापूर्वी तिच्यावर बलात्कार झाला हे सिद्ध करणारा पुरावा आढळला नाही, असे दिल्ली पोलिसांनी न्यायालयाला सांगितले.

या प्रकरणातील स्मशानभूमीतील पुजारी राधेश्याम आणि तेथील कर्मचारी कुलदीपसिंह यांनी बलात्कार करून खून केल्याचा जबाब अन्य दोन आरोपींनी दिला होता. सलीम अहमद आणि लक्ष्मी नारायण या कर्मचाऱ्यांनी बालिकेवर अंत्यसंस्कार करण्यासाठी मदत केल्याचे जबाबात उघड झाले होते. या प्रकरणाच्या तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले, की यातील एकही विधान किंवा प्रत्यक्ष साक्षीदार किंवा वैद्यकीय तपासणीसह अन्य कोणताही पुरावा बालिकेवर बलात्कार झाला की नाही हे निश्चित करण्यासाठी आढळला नाही.

जाहीर नोटीस

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही डेकोर रियल इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड ("डेकोर"), कंपनी अधिनियम, 1956 च्या तरतुदी अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आणि त्यांचे नोंदणीकृत कार्यालय १००, संत सावता मार्ग, मुस्तफा बाजार, मुंबई - ४०० ०१० येथे असलेले, येथे खालील लिखित प्रथम परिशिष्टात अधिक विशेषत्वाने वर्णन केलेली प्रथम मालमत्ता आणि येथे खालील लिखित द्वितीय परिशिष्टात अधिक विशेषत्वाने वर्णन केलेली द्वितीय मालमत्ता (येथे यानंतर एकत्रितपणे "सदर मालमत्ता" म्हणून संदर्भित) च्या संदर्भात त्यांच्या अधिकार, शीर्षक आणि स्वारस्याची चौकशी करत आहोत.

डेकोर पहिल्या मालमत्तेच्या संदर्भात पट्टेदार आहेत आणि पट्टेदारांनी दुसऱ्या मालमत्तेच्या संदर्भात अनुक्रमांक नं. २०१५ चे बीबीई-१/८८७० अंतर्गत [illegible] नोंदणीकृत विकास करार दिनांकीत १३ सप्टेंबर, २०१४ द्वारे आणि अंतर्गत पट्टेदार [illegible] ट्रस्ट कडून दुसऱ्या मालमत्तेच्या संदर्भात विकास अधिकार प्राप्त केले आहेत. डेकोरचे (i) प्रथम मालमत्तेतील विकास अधिकार देण्यास आणि (ii) द्वितीय मालमत्तेतील त्यांचे विकासाचे अधिकार [illegible]

[illegible]

कोणत्याही व्यक्ती/संस्थांनी याद्वारे त्यासंबंधी लेखी स्वरूपात समर्थनार्थ कागदपत्री पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय पत्ता [illegible], ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे, अन्यथा असा कोणताही कथित दावा/आक्षेप, स्वारस्य किंवा मागणी सर्व हेतु आणि उद्देशांसाठी माफ केले आहेत आणि/किंवा सोडून देण्यात आले आहेत असे मानले जाईल.

उपरोक्त संदर्भित प्रथम परिशिष्ट

("सदर प्रथम मालमत्ते"चे वर्णन)

लॅमिंग्टन रोड, मुंबई येथे स्थित भायखळा विभागाचा सी. एस. क्र. २/११०० असलेला आणि प्लॉट नं. ९५ए, ९५बी आणि ९७ आणि नवीन सर्वे क्र. [illegible] असलेल्या क्षेत्रफळ [illegible] चौरस मीटर एवढी सर्व तीन होल्ड जमीन त्यावर उभ्या असलेल्या संरचनांसह आणि त्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे:

पूर्वेस किंवा त्यादिशेने: डॉ. ए. नायर रोड;
दक्षिणेस किंवा त्यादिशेने: सी. एस. क्र. १९००;
पश्चिमेस किंवा त्यादिशेने: सी. एस. क्र. [illegible];
उत्तरेस किंवा त्यादिशेने: सी. एस. क्र. [illegible].

उपरोक्त संदर्भित द्वितीय परिशिष्ट

("सदर द्वितीय मालमत्ते"चे वर्णन)

डॉ. आनंदराव एल. नायर रोड (पूर्वीचा लॅमिंग्टन रोड), मुंबई येथे स्थित भायखळा विभागाचा सी. एस. क्र. ३/११०० असलेल्या क्षेत्रफळ [illegible] चौरस मीटर एवढी सर्व तीन होल्ड जमीन त्यावर उभ्या असलेल्या संरचनांसह आणि त्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे:

पूर्वेस किंवा त्यादिशेने: डॉ. ए. नायर रोड;
दक्षिणेस किंवा त्यादिशेने: सी. एस. क्र. २/११००;
पश्चिमेस किंवा त्यादिशेने: सी. एस. क्र. २/११००;
उत्तरेस किंवा त्यादिशेने: सी. एस. क्र. १६९९.

दिनांकीत द्वा १४ ऑगस्ट, २०२१

कांगा आणि कंपनी
स्वाक्षरी/-
(सुश्री. [illegible])
भागीदार
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स